Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# जुन्या वाहनांची बाजारपेठ सुसाट!

दत्तात्रय जाधव

## गोषवारा

देशात जुन्या वाहनांची बाजारपेठ फुलली आहे. नव्या कोऱ्या वाहनांपेक्षा जुन्या वाहनांची संख्या तोडीस तोड आहे. जीएसटी कपातीमुळे किंमती कमी झाल्या असून, त्याचा लाभ इच्छुक वाहनधारक दोन्ही ठिकाणी घेत आहेत. काही वर्षांपूर्वीची जुनी वाहने खरेदी करून ग्राहक आपले स्वप्न पूर्ण करत असल्याचे चित्र दिसत आहे. जुनी बाजारपेठ झपाट्याने वाढत असून, ती आता एक मोठी बाजारपेठ बनली आहे. 2030 पर्यंत भारतात दरवर्षी जवळपास एक कोटी जुनी वाहने विकली जाण्याची शक्यता आहे.

## प्रस्तावना

काही वर्षांपासून जुन्या गाड्यांची खरेदी-विक्री नवीन गाड्यांच्या विक्रीपेक्षा जास्त वाढ दर्शवत आहे. उदा. 2018-2019 मध्ये 40 लाख जुन्या गाड्या विकल्या गेल्या होत्या, तर नवीन गाड्यांची विक्री 36 लाख होती. नवीन गाड्या आणि जुन्या गाड्यांच्या विक्रीचे प्रमाण आता 1:2.12 पर्यंत पोहोचले आहे. काही वर्षांपूर्वी ते 1:1.21 होते. एकंदरीत ते जुन्या वाहनांची मागणी वाढल्याचे दर्शवते. 2023 मध्ये या बाजारपेठेचे मूल्य सुमारे 561.13 दशलक्ष डॉलर्स होते आणि 2023 ते 2032 पर्यंत अंदाजे 17.60 टक्के चक्रवाढ वार्षिक वाढ दराने वाढण्याची अपेक्षा आहे.
मध्यमवर्गीय आणि पहिल्यांदा गाडी खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी कमी बजेटमध्ये वाहन खरेदी करण्याचा हा सोपा आणि किफायतशीर मार्ग आहे. सुरक्षितता आणि सोयीसाठी सार्वजनिक वाहतुकीपेक्षा खासगी वाहनांना प्राधान्य देणे वाढले आहे. नवीन गाड्यांचा 'वेटिंग पिरियड' आणि सेमी कंडक्टर चिप्सची कमतरता किंवा इतर कारणांमुळे नवीन गाड्या मिळण्यास लागणाऱ्या जास्त वेळेमुळे जुन्या गाड्यांकडे कल वाढला आहे. जुन्या गाड्यांसाठीही कर्ज आता सहज उपलब्ध होत आहे. वाढत्या उत्पन्नामुळे ग्राहक आता महागड्या गाड्यांचा अनुभव घेण्यासाठी जुन्या गाड्या निवडत आहेत.

कोणत्या गाड्यांना मागणी वाढली?

हॅचबॅकमध्ये मारुती सुझुकीची वॅगनआर, अल्टो आणि स्विफ्ट यांसारख्या गाड्यांची मागणी आजही सर्वाधिक आहे. ह्युंदाई क्रेटा, टाटा नेक्सॉन आणि मारुती ब्रेझा यांसारख्या एसयूव्हींना आता चांगली मागणी आहे. इतर लोकप्रिय मॉडेल्समध्ये मारुती डिझायर, होंडा सिटी आणि टोयोटा इनोव्हा यांचीही लोकप्रियता वाढत आहेत. या क्षेत्रात असंघटीत क्षेत्राचे वर्चस्व वाढत आहे. त्यामध्ये स्थानिक वितरक, दलाल आणि वैयक्तिक विक्रेते यांचा वाटा अजूनही मोठा आहे. ऑनलाइन प्लॅटफॉर्ममध्ये कार्स 24, ट्रू व्हॅल्यू आणि महिंद्रा फर्स्ट चॉईस यांचा समावेश आहे. त्यांच्याकडे गाड्यांचा विपुल साठा आहे. कर्जही देतात. ग्राहकांना असंख्य मॉडेल पाहण्याची संधी मिळते. पारदर्शक व्यवहार आणि विश्वासार्हता त्यांनी कमावली आहे. त्यामुळे त्यांच्याकडे ग्राहकांचा ओढा वाढत चालला आहे.

Mahratta
Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

दरम्यान, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि दिल्ली या राज्यांनी जुन्या गाड्यांच्या विक्रीत आघाडी घेतली आहे. उत्तर भारत या बाजारपेठेत सर्वात मोठा वाटा उचलतो, त्यानंतर दक्षिण भारताचा क्रमांक लागतो. केंद्र सरकारने आणलेल्या 'स्क्रॅपिंग पॉलिसी'मुळे जुन्या वाहनांवर परिणाम झाला आहे. 20 वर्षांवरील जुन्या वाहनांच्या नोंदणी नूतनीकरणासाठी शुल्क वाढवल्यामुळे जुनी वाहने वापरणे महाग झाले आहे. या बाबी काहीशा ग्राहकांना त्रासदायक ठरत आहेत. पुणे आरटीओसारख्या प्रादेशिक परिवहन विभागांनी जुन्या वाहन विक्रेत्यांना अधिकृत परवाना देण्याचा निर्णय घेऊन फसवणुकीचा धोका कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

किफायतशीर किंमत आणि आर्थिक गणित

जुनी वाहने नवीन वाहनांपेक्षा खूप स्वस्त मिळतात, त्यामुळे मध्यम-वर्गीय आणि प्रथमच मोटार खरेदी करणाऱ्या ग्राहकांना ते परवडणारे ठरते. गेल्या काही वर्षांत सुरक्षा नियम, उत्सर्जन नियम, कच्चा माल महाग झाल्यामुळे नवीन गाड्यांच्या किमतीत वाढ झाली आहे. यामुळे ग्राहक जुन्या पर्यायाकडे वळत आहेत. पहिल्या काही वर्षांमध्ये नवीन गाडीची किंमत खूप झपाट्याने कमी होते. जुनी गाडी घेतल्यास, खरेदीदार आधीच झालेला हा मोठा घसारा वाचवतो. अनेक लोक आता 3 ते 4 वर्षांत आपली वाहने बदलतात, त्यामुळे बाजारात चांगल्या स्थितीतील गाड्यांचा पुरवठा वाढला आहे. 25 ते 45 वयोगटातील तरुण खरेदीदार मोठ्या संख्येने जुन्या मोटारी खरेदी करत आहेत. यातील 60 टक्के ग्राहक पहिल्यांदाच मोटार खरेदी करत आहेत.
सरकारने नुकतेच मोटार वाहन कायद्यात बदल करून खासगी वाहनांना 20 वर्षांपर्यंत वापरण्याची परवानगी दिली आहे; परंतु यासाठी फिटनेस चाचणी आणि वाढीव नोंदणी शुल्क आवश्यक आहे. यामुळे जुन्या वाहनांना रस्त्यावर टिकून राहण्याची संधी मिळाली आहे. जुन्या वाहनांचा बाजार 2026-27 पर्यंत जवळपास 80 लाख युनिट्सच्या विक्रीपर्यंत पोहोचेल, असा जाणकारांचा अंदाज आहे.

जुन्या वाहनांच्या बाजारपेठेचे भविष्य

सध्या भारतात प्रत्येक नवीन गाडीच्या विक्रीमागे जवळपास 1.4 जुनी वाहने विकली जात आहेत आणि हे प्रमाण वाढत आहे. या बाजारपेठेचे मूल्य 2030 पर्यंत जवळपास 20 लाख कोटी (68.32 अब्ज) पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. त्यात वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर 15 ते 17 टक्के अपेक्षित आहे. त्यामुळे भारतातील जुन्या वाहनांच्या बाजारपेठेचे भविष्य उज्ज्वल आहे आणि त्यात मोठे बदल अपेक्षित आहेत.
सध्याचा बहुतांश असंघटित बाजार 2030 पर्यंत 50 टक्क्यांपेक्षा जास्त संघटित होण्याची अपेक्षा आहे. यामुळे फसवणुकीची शक्यता कमी होईल आणि प्रक्रिया अधिक सुलभ होईल. गाडीची तपासणी, डिजिटल कागदपत्रे, ऑनलाइन लिलाव आणि घरपोच डिलिव्हरी या सेवांमध्ये वाढ होईल. इलेक्ट्रिक वाहने बाजारात मोठ्या प्रमाणावर आल्यास, जुन्या पेट्रोल-डिझेल वाहनांच्या मूल्यावर परिणाम होऊ शकतो. तसेच, जुन्या इलेक्ट्रिक वाहनांसाठी एक नवीन बाजारपेठ हळूहळू उदयाला येईल. मात्र इलेक्ट्रिक वाहनांच्या किंमती सध्या अधिक आहेत. त्यामुळे त्या खरेदी करणे सर्वच ग्राहकांना परवडत नाही. काळानुसार त्यांच्या किंमती कमी झाल्यास ग्राहकांचा फायदा होणार हे निश्चितच आहे.

नवीन वाहन स्क्रॅपिंगच्या धोरणामुळे जुनी आणि प्रदूषण करणारी वाहने रस्त्यावरून दूर होतील, त्यामुळे चांगल्या स्थितीत असलेल्या जुन्या वाहनांना जास्त मागणी मिळेल. एकंदरीत जुनी वाहने आता नाईलाज नसून निवडीचा पर्याय बनली आहेत.

**निष्कर्ष**

जुन्या वाहनाची मागणी देखील वाढत आहे. नव्या वाहनांपेक्षा जुनी वाहने खरेदी करणे कधीही फायद्याचे. कारण त्यासाठी जास्त भरमसाठ पैसे मोजावे लागत नाही. स्वप्न पूर्ण होते. मात्र ती फारच जुनी असता कामा नयेत. आता विविध वितरकांनी नव्या वाहनांप्रमाणे सुविधा दिली आहे. कर्जही दिले जाते. त्याशिवाय एकच ठिकाणी विविध मॉडेल पाहता येतात. अनेक ठिकाणी फेऱ्या ग्राहकाला माराव्या लागत देखील नाहीत.